कि र अंधारी रात्र, घनदाट जंगल आणि त्या जंगलातलं एकाकी घर. घराच्या एका कोपऱ्यात अलीबाबा आणि त्याची प्रेयसी मरजीना एका जटील समस्येवर विचार करत होते. त्या कोपऱ्यात एक छोटीशी मेणबत्ती मिणमिणत होती. भिंतींवर ढाली आणि तलवारी दिसत होत्या. अलीबाबाचे चाळीस डाकू त्या काळरात्रीत काळे कपडे परिधान करून इकडे तिकडे वावरताना दिसत होते.

महाबळेश्वरच्या एका टेकडीवर असलेल्या पडक्या रोज हाऊसमध्ये निर्माता विजय रंगलानींच्या *अलीबाबा और चालीस चोरचं* चित्रीकरण सुरू होतं. आम्ही त्या ठिकाणी पोहोचलो तेव्हा अलीबाबाच्या भूमिकेत अरबाज खान आणि मरजीना बनलेली पिंकी हरवानी उभे होते. दिग्दर्शक सुनील अग्नीहोत्री त्या दोघांना पुढचा शॉट समजावत होते. दोन्ही



अरबाज, दिग्दर्शक सुनील अग्निहोत्री आणि पिंकी हरवानी

महाबळेश्वरच्या भूतबंगल्यात...

अलीबाबा आणि चाळीस चोर

मुख्य कलाकार सीनसाठी तयार आहेत हे लक्षात आल्यावर दिग्दर्शकांनी शॉट घेण्याच्या सूचना दिल्या आणि अरबाज-पिंकी सराईतासारखे आपल्या भूमिकांत शिरले.

अलीबाबाः कासम का कत्ल हुआ वो यह बात तो मान लेगी, लेकीन लाश के दो टुकडे वो नही देख पायेगी. यह सदमा बरदास्त करना उसके लिए मुश्किल है.

मरजीनाः इसका कोई रास्ता है?(विचार करते) हा एक रास्ता है.

अलीबाबाः रास्ता?

मरजीनाः हां, लाश के टुकडों को जोड दिया जाए.

अलीबाबाः लेकीन, लाश के टुकडों को कौन जोडेगा?

मरजीनाः मुश्ताक मोची.

अलीबाबाः मुश्ताक मोची मुझे जानता है.

मरजीनाः तुम उसके सामने नहीं जाओगे. यह काम तुम मुझ पर छोड दो और मरजीना की चालाकी और होशियारी का कमाल देखो.

या संवादांबरोबरच सीन पूर्ण झाला आणि आम्ही दिग्दर्शक सुनील अग्नीहोत्रीबरोबर गप्पा मारू लागलो.

'या सीनमध्ये अलीबाबाचा लहान भाऊ, कासीम याचा खून झालेला असतो आणि त्याची आई आपल्या मुलाच्या शरीराचे तुकडे तुकडे झालेले पाहून धसका घेईल या विचाराने अलीबाबा आणि त्याची प्रेयसी मरजीना दोघंही सल्ला मसलत करतायत. दिग्दर्शक म्हणून मी माझी कारकीर्द सुरू केल्यावर *दंगा फसाद*, *लाट सा'ब*, *जयकिशन*, *दावा*सारखे अनेक चित्रपट दिग्दर्शित केले. नंतर मी काही काळ मालिकांवर लक्ष केंद्रित केलं होतं. *चंद्रकांता*पाठोपाठ *बेताल पचीसी*, *युग*, *जय गणेश*चं दिग्दर्शन केलं. सध्या मालिकांचा दर्जा असा काही घसरलाय की, तिथे काही करायची इच्छाच होत नाही. म्हणून मग मी पुन्हा सिनेमांकडेच मोर्चा वळवला. इथे मला काहीतरी वेगळं करायचंय. आजच्या काळात *अलीबाबा और चाळीस चोर*सारखा सिनेमा बनवण्यामागचा हेतू एकच आहे, आजच्या मुलांपर्यंत या गोष्टी पोहोचवाव्यात. मी हा सिनेमा मुलांसाठीच बनवतोय. माझा एक मित्र राजू कारिया याने मला अलिबाबा नव्या शैलीत बनवण्याचा सल्ला दिला. मी तेच केलंय.

माझ्या सिनेमातला हा अलिबाबा गावातला एक साधा सरळ तरुण आहे. दुर्दैवाने तो डाकू बनतो. सोनापूर नावाच्या गावात तो राहात असतो. त्या ठिकाणी अजून वीजेची सुविधाही पोहोचलेली नसते. आम्ही जुनीच कथा जरा नव्या ढंगात पेश करण्याचा प्रयत्न केलाय. पिंकी हरवानीसारखी फ्रेश चेहऱ्याची नायिका घेतली. हा सिनेमा आम्ही एकाच शेड्युलमध्ये पूर्ण करतोय. त्यानंतर ग्रेहाम स्टेन्स हत्याकांडावर आधारित एक प्रोजेक्ट मी हाती घेणार आहे. शिवाय सहारा वाहिनीसाठी *गुलबकावली* नावाची मालिकाही मी बनवतोय.'

रोज हाऊसमध्ये थंडी जाणवत होती. शूटिंग सुरू असलेल्या त्या कोपऱ्यात अरबाज आणि पिंकीबरोबर आता काही डाकूही दिसू लागले. त्यात तेज सप्रू, अली खान, शिवा वगैरे मंडळी ओळखीची दिसत होती.

या मालिकेच्या निर्मात्यांनी आधी *अपमान की आग*, *जयकिशन* आणि *यशवंत*सारखे काही सिनेमे बनवलेले आहेत. महाबळेश्वरचं हे शेड्युल बावीस दिवसांचं आहे. नंतर मुंबईला उरलेलं शूटिंग पूर्ण करण्यात येईल अशी माहिती

निर्मात्यांनी दिली. या चित्रपटातील स्पेशल इफेक्ट्स हे मुख्य आकर्षण असणार आहे. आनंद-मिलींदच्या संगीत दिग्दर्शनात पाच गीतंही रेकॉर्ड करण्यात आली आहेत.

आता सेटवर दिग्दर्शक पिंकी हरवानी आणि तेज सप्रूचा सीन घेत होते. अरबाज मोकळा होता. कानात डूल आणि मळका चेहरा असा त्याचा अवतार दिसत होता.

'लहानपणी मी अनेकदा अलीबाबाची गोष्ट आवडीने ऐकली होती. धर्मेंद्र-झीनत अमानचा सिनेमाही मी पाहिला होता. या चित्रपटात अरबी अलीबाबाऐवजी हिंदुस्तानी अलीबाबाची कथा गुंफण्यात आलीय. निव्वळ मनोरंजनाच्या हेतूने बनवलेला हा सिनेमा लहान-थोर सगळ्यांनाच आवडेल असं मला वाटतं. मुख्य म्हणजे यात डायनासोरबरोबरच्या लढतीचंही एक दृश्य आहे.'

आपल्या कारकीर्दीविषयी अरबाज मोकळेपणाने बोलू लागला. '*दरार* माझा पहिला सिनेमा. त्यासाठी मला फिल्मफेअर पुरस्कारही मिळाला होता. सहा वर्षांत मी अनेक सिनेमे केले पण त्याबाबत मला फारसं समाधान लाभलेलं नाही. सुरुवातीपासूनच रोमॅण्टिक भूमिका न करण्याचं मी ठरवलेलं होतं. माझा चेहरा आणि व्यक्तिमत्त्व रोमॅण्टिक भूमिकेला साजेसं नाही. सध्या माझ्याकडे *ताजमहल*, *गर्व* आणि *वजह* हे आणखी काही प्रस्तावही आहेत. अधिकारी ब्रदर्सच्या *वजह*चं काम नुकतंच सुरू झालंय. त्या रोमॅण्टिक सस्पेन्स सिनेमात ग्रेसी सिंग माझी नायिका आहे. माझी कारकीर्द निश्चित गतीने पुढे सरकतेय असंच मला वाटतं.'

लोकेशनवर थंडी वाढत होती आणि युनिटमध्ये चहाचा राऊंड सुरू झाला.

'अभिनेत्री म्हणून माझा पहिला सिनेमा *जानशीन* रिलीज झालाय,' चहाचा घोट घेत पिंकी म्हणाली. 'पण त्यातल्या अभिनयापेक्षा अंगप्रदर्शनाचीच चर्चा अधिक झाली. म्हणून यापुढे अंगप्रदर्शनाचा आग्रह धरणारे प्रस्ताव स्वीकारायचे नाहीत असं मी ठरवलंय. मर्जीनाची भूमिका साकारताना मला खूप मजा वाटतेय. एक तर मी अरबाजची नायिका आहे आणि आजच्या पठडीतल्या नायिकांपेक्षा मरजीना वेगळी आहे.'

एव्हाना युनिटने तो कोपरा सोडला होता. बाहेर झाडाझुडपातले शॉट्स घ्यायचे होते. त्याची तयारी सुरू झाली. अरबाजसाठी घोडा तयार करण्यात आला. मशाली पेटवण्यात आल्या. तेज सप्रू जकालीच्या महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसत होता. 'आजवर मी एकशे सत्तर सिनेमांत काम केलंय. तरीही मी अजून स्वतःला स्ट्रगलरच समजतो. या सिनेमाचं बरचसं शूटिंग मी रात्रीच केलंय. कारण मी यात चोर बनलोय आणि चोर रात्रीच्याच वेळी कामाला लागतात. आजवरच्या कारकीर्दीत मी कधीच इतकी जागरणं केली नाहीत. भविष्यात मला लेखन-दिग्दर्शनाकडे वळायचंय.' (तेजची बहीण रीमा राकेशनाथ ही लेखिका-दिग्दर्शिकाच आहे.)

शॉट तयार होता. अरबाजने घोड्यावर मांड ठोकली. पेटत्या मशाली झाडांवर लटकवण्यात आल्या. दिग्दर्शकाच्या सूचनांबरहुकूम शॉट घेण्यात आल्या. घोड्यावर स्वार अरबाज झाडांच्या आड लपला आणि मशालधारी चोरांनी त्याला घेराव घातला.

या दृश्याबरोबरच शॉट ओके झाला आणि आम्ही त्या कडाक्याच्या थंडीतून सुटका करून घेण्यासाठी तिथल्या लोकांचा निरोप घेतला.

☐ नरेंद्र उपाध्याय



अरबाज आणि पिंकी हरवानीः
हम है अलीबाबा और मरजीना



चोरांच्या वेषात सजलेले शिवा आणि
तेज सप्रूसह साध्या पोशाखात अरबाज

अलीबाबा आणि तेरा चित्रपट

* १९२७ - *अलीबाबा ॲण्ड ४० चोर* (मूकपट) * १९३२- *अलीबाबा और ४० चोर* (मूकपट) * १९४०- *अलीबाबा* - सुरेंद्र, सरदार अख्तर, गुलाम मोहम्मद, निर्माताः सागर, दिग्दर्शकः मेहबूब, संगीतः अनिल बिश्वास * १९४६- *अलीबाबा*. निर्माताः मोहन पिक्चर्स, दिग्दर्शकः एन. वकील, शांता पटेल, प्रकाश, संगीतः डी. शर्मा * १९५४- *अलीबाबा ॲण्ड फोर्टी थिव्ज*, निर्माताः बसंत, दिग्दर्शकः होमी वाडिया, शकीला, महीपाल, बी.एम.व्यास, एस. एन.त्रिपाठी, संगीतः त्रिपाठी-चित्रगुप्त. * १९५४ मध्येच निर्माता एस.एस.क्वात्रांनी अलीबाबावर कॉमेडी सिनेमा बनवला होता. *चालीस बाबा एक चोर*. दिग्दर्शकः पी.एल.संतोषी, संगीत एस.डी. बर्मन. * १९६३- *एक था अलीबाबा*. निर्माताः शंकर मुव्हीज, दिग्दर्शकः हरबंस दार सिंग. निशा तिवारी आणि हिरालाल. संगीतः हंसराज बहल. * १९६५- *सिंदबाद अलीबाबा अल्लादीन*, निर्माताः ऑल इंडिया पिक्चर्स. प्रदीपकुमार, सईदा खान, आगा, भगवान, हेलन, दिग्दर्शकः पी.एन.अरोरा, संगीतः रवी * १९६६- *अलीबाबा ॲण्ड फोर्टी थिव्ज*. निर्माताः बसंत, दिग्दर्शक होमी वाडिया. संजीवकुमार-एल. विजयालक्ष्मी, इंदिरा. संगीतः उषा खन्ना. * १९७६ - *अलीबाबा*. निर्माता पी.एल.शर्मा, दिग्दर्शकः मोहम्मद हुसेन, संगीतः हंसराज बहल. दारा सिंग, कोमिला विर्क, देवकुमार, राधा सलुजा. * १९७६ - *४० चोर*. निर्माताः केवी प्रॉडक्शन्स, दिग्दर्शकः शशीकुमार, प्रेम नझीर, जया भारती, ज्योती लक्ष्मी, संगीतः देवराज एस. * १८७७ - *अलीबाबा मर्जीना*, निर्माताः ताराचंद बडजात्या, दिग्दर्शकः केदार कपूर, संगीतः उषा खन्ना, प्रेम किशन, तमन्ना पेन्टल. * १९८० - *अलीबाबा और चालीस चोर*, निर्माताः एफ.सी. मेहेरा, दिग्दर्शकः उमेश मेहेरा, संगीतः आर.डी.बर्मन, धर्मेन्द्र, हेमामालीनी, झीनत अमान, प्रेम चोप्रा.